# महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**
*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*
ई-मेल पत्ता:- jtdire.१११५@gmail.com दूरध्वानी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.

क्र.विससं/उशि/कोविप/लेखा/2021-22/1442 दि. 09.07.2021

**परिपत्रक**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अधिनस्थ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये
जि.ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषय :- सन 2021-22 करीता वेतन अनुदान वितरणाबाबत...**
**अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या अर्जित रजारोखीकरण बाबत**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या अर्जित रजा शिल्लक आहे. अशा कर्मचां-यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्ताव प्रस्तूत कार्यालयाकडून पडताळणी करुनच सादर करण्यात यावे. सदर पडताळणी करीता व प्रस्ताव सादर करतेवेळी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावीत, सदर अर्जित रजारोखीकरणाच्या प्रस्तावाची पडताळणी न झाल्यास किंवा अर्जित रजेची रक्कम संबंधित कर्मचा-यास न मिळाल्यास सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य म्हणून आपली राहील याची नोंद घ्यावी.

१. **पडताळणी करीता कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तक**
२. **महाविद्यालयाचे मागणी पत्र व प्राचार्य यांचे करीता संस्थेचे मागणी पत्र**
३. **Calculation Sheet**
४. **महाविद्यालय / संस्थेच्या ठरावाची छांयाकित प्रत. (प्राचार्य यांचे करीता संस्थेच्या ठरावाची प्रत)**
५. **कार्यालयीन मंजूरी आदेश (प्राचार्यांचे आदेश या कार्यालयाचे स्तरावर निर्गमित केले जातील.)**
६. **अंतिम वेतन प्रमाणपत्र / अंतिम वेतन चिठठी**
७. **ना-देय / ना-चौकशी प्रमाणपत्र**
८. **अतिप्रमाणाबाबतचे महाविद्यालयाचे हमीपत्र (मूळ प्रत)**
९. **अतिप्रदानाबाबतचे कर्मचा-यांचे हमीपत्र (छायांकीत प्रत प्राचार्याचे प्रतिस्वाक्षरीने)**
१०. **सेवापुस्तकामधील पहिल्या पान व अर्जित रजेच्या हिशोबाची छायांकित प्रत (सुस्पष्ट दिसेल अशी प्राचार्यांचे प्रतिस्वाक्षरीने प्रमाणित असणे आवश्यक)**
११. **कर्मचारी मयत झाला असल्यास मृत्यु दाखला व कर्मचा-याने घोषित केलेले वारसाचे प्रमाणपत्र (छायांकीत प्रत प्राचार्याचे प्रतिस्वाक्षरीने)**

विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

Scanned by CamScanner